सुकुप्र / सर्व. सभा. / ११ / २०२२-२३ २७.०१.२०२३

प्रति,
सर्व माननीय कार्यकारिणी सदस्य,
देणगीदार सदस्य,
वार्षिक सर्वसाधारण सदस्य,
निमंत्रित व हितचिंतक सदस्य,

स.न.वि.वि.

कळविण्यास आनंद वाटतो की, दि. १८ जानेवारी, २०१८ रोजी नोंदीकृत झाल्यांनतर आपणा सर्वांच्या साथीने सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या कार्याची पाच वर्षे पूर्ण झाली. या काळात आपण अनेक कार्यक्रम आयोजित केले व जनमानसात आपला किमान लौकिक निर्माण करू शकलो. अर्थात आपली स्वप्ने, ध्येये अजून खूप दूरवर आहेत. ही क्षितिजे गाठण्यासाठी आपल्याला अजून बरंच एकवटणं आवश्यक आहे. अनेकांच्या शुभेच्छा, सातत्यपूर्वक अर्थसाह्य आणि त्याहीपेक्षा विश्वास व स्नेह यांच्या बळावर आपण येथवर वाटचाल केली. भविष्यात या सगळया उपक्रमांचे स्वरूप आणखी सर्वव्यापी व दूरगामी करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोतच. आजवर मिळालेल्या या सहकार्याबद्दल कार्यकारी मंडळ कृतज्ञता व्यक्त करते व हे पाठबळ असेच रहावे व वृद्धिंगत व्हावे, हे नम्र आवाहन करते.

या कार्यकाळाबरोबरच पहिल्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाळही प्रतिष्ठानच्या सन्माननीय घटनेनुसार संपुष्टात आला असून, पुढील पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी नव्या कार्यकारी मंडळाची निवड निवडणूक प्रक्रियेने करणे क्रमप्राप्त आहे. यास्तव ही सूचना. आपल्याला ज्ञात आहेच की, पाचव्या **वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि. १९ फेब्रुवारी (रविवार) रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले आहे.** (स्थळ : हॉटेल ब्रिज, शिवाजी चौक, लातूर) या सभेत नवीन कार्यकारी मंडळाची निवड होणार आहे.

त्यासाठी नवीन कार्यकारी मंडळात सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या आजीव सभासदांनी आपला **विहित स्वेच्छा अर्ज** कार्यवाह किंवा मा. अध्यक्ष यांचेकडे अथवा त्यांना निर्देशित करून **दि. १५ फेब्रुवारी रोजीपर्यंत** प्रतिष्ठानच्या अधिकृत ईमेल पत्त्यावर सादर करून कार्यवाह यांना तसे अवगत करावे. **अर्जाचा नमुना संकेतस्थळावर व प्रतिष्ठानच्या अधिकृत समाज माध्यमाच्या पटलावर** उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच घटनेची प्रतही या दोन्ही पटलावर अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवाय, वैयक्तिक संपर्काने कार्यवाह यांच्याकडून ती उपलब्ध करून घेता येईल.

प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी,
कार्यवाह

हेच पत्र सर्व आजीव सभासदांना त्यांच्या समाजमाध्यमाच्या (व्हॉट्स ॲप) वैयक्तिक संपर्क खात्यावर पाठवले जाणार आहे. अन्य प्रत्यक्ष पत्र पाठवण्यात येणार नाही.